।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Office of the Controller of Examinations**
**Phone: (02462)229294** **website: srtmun.ac.in** **E-mail: srtmuncoe@gmail.com**
**FAX No: (02462) 229520**

जा.क्र.पनिका/पदवी आवेदनपत्र/२०१६-१७/ १४५१ दिनांक : २४/०१/२०१७.

**पदवी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रासोबत पदवी आवेदनपत्र भरुन घेणेबाबत.**

## परिपत्रक

**प्रस्तावणा :**

प्रस्तुत विद्यापीठातुन पदवी /पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण होऊन ३-४ वर्ष झाले तरीही बहुतांश विद्यार्थी पदवी (Degree Certificate) घेण्यासाठी आवेदनपत्र सादर करीत नाहीत व अशा विद्यार्थ्यांना नौकरी व पुढील प्रवेशासाठी आवश्यकता भासल्यास तातडीने पदवी प्रमाणपत्र देण्याची विनंती करतात त्यामुळे विद्यापीठ प्रशासनावर ताण येतो व विद्यार्थ्यांचींही गैरसोय होते. हि गैरसोय टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळणे सुकर व्हावे म्हणुन उपाययोजना करण्याची बाब विचाराधीन होती.

दि. १२/०८/२०१६ रोजी संपन्न झालेल्या मा. विद्या परिषदेच्या बैठकीतील विषय क्र. ३१/३६-२०१६ नुसार पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा आवेदन पत्रासोबत पदवी आवेदनपत्र (Convocation Form) भरुन घेण्यात यावेत असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शैक्षणिक संकुलाचे संचालक, संचालक उपकेंद्र लातूर , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, उन्हाळी २०१७ मध्ये होणा-या परीक्षेपासुन हा निर्णय अंमलात येणार आहे.

सबब, उन्हाळी २०१७ करीता परीक्षा आवेदनपत्र सादर करणा-या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा आवेदनपत्रासोबत पदवी आवेदनपत्र योग्य त्या शुल्क ासह म्हणजेच उपस्थित राहुन पदवी प्रमाणपत्र घेणा-या विद्यार्थ्यांसाठी रु. १७०/-+१०/- व अनुपस्थीत राहुन पदवी पोस्टाने प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांसाठी रु. २२०/-+१०/- अशा प्रमाणे (Convocation Form) भरुन घेण्यात यावेत व आवेदनपत्रासोबत प्रथम व व्दितीय वर्षाच्या

गुणपत्रिकेची प्रत जोडावी. सदरील पदवी आवेदनपत्र परीक्षा आवेदनपत्रासोबतच दीक्षांत विभागामध्ये सादर करण्यात यावेत. जेणेकरुन दीक्षांत समारंभानंतर विद्यार्थ्यांना त्वरीत पदवी प्रमाणपत्र मिळणे सोईचे होईल.

महाविद्यालयाने पदवी आवेदनपत्र सादर करतांना विद्यार्थ्यांची उपस्थित राहुन पदवी स्विकारणारे , पोस्टाव्दारे पदवी स्विकारणा-यांची स्वतंत्र यादी तयार करुन सदर यादी व शुल्क दीक्षांत विभागात जमा करण्यात यावेत. परीक्षा आवेदनपत्र सादर करतेवेळी दीक्षांत विभागास पदवी आवेदनपत्र सादर केलेला पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

उपस्थित राहुन पदवी स्विकारणारे विद्यार्थी दीक्षांत समारंभास अनुपस्थित असतील तर अशा विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र संबंधीत महाविद्यालयास पाठविण्यात येतील. महाविद्यालयाने हि पदवी प्रमाणपत्रे संबंधीतांना वितरीत करण्याची व्यवस्था करावी व त्यासाठी एक स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी.

या व्यतिरिक्त ज्या विद्यार्थ्यांनी पोस्टाव्दारे पदवी प्रमाणपत्राची मागणी केली असेल अशा विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र विद्यापीठातर्फे संबंधीतांना पोस्टाव्दारे पाठविण्यात येतील. उपरोक्त बाबींची सर्वांनी नोंद घेवुन त्यानुसार कार्यवाही करावी.

कळावे,

**परीक्षा नियंत्रक**

**प्रत माहितीस्तव :**

मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, उपकेंद्र लातूर, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, म.वि.वि.मं, प्रस्तुत विद्यापीठ
मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
कार्यालयीन अधिक्षक (सर्व) परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
कार्यालयीन अधिक्षक, (दीक्षांत कक्ष) परीक्षा विभाग : यांना देवुन कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रकान्वये कार्यवाही करावी.